**मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४**

संदर्भ क्र.:एमएमसीसी/ महाराष्ट्र स्टेट स्कॉलरशिप / २०२४-२०२५/393 २१/०२/२०२५

**नोटीस**

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२४-२०२५ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता स्पेशल ड्राईव्ह सोमवार दिनांक २४/०२/२०२५ रोजी महाविद्यालयात आयोजित होणेबाबत..**

**वरिष्ठ महाविद्यालयात द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष बीबीए, बीबीए (आय बी), बीबीए (सी ए), बीएस (सी एस)** सर्व पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना यापूर्वीच्या नोटिसेद्वारे स्कॉलरशिप अथवा फ्रीशिपचे अर्ज भरण्याबाबत महाविद्यालयाकडून सूचित करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांना अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणीसाठी महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप/फ्रीशिपचे अर्ज ऑनलाईन भारण्याबाबतचे मार्गदर्शनपर सत्र दिनांक ०५/१०/२०२४ व ०६/१०/२०२४ रोजी आयोजित केले होते व त्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून महाविद्यालयात जमा करण्याबाबत देखील सूचित करण्यात आले होते. तथापि, अजूनही भरपूर विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरलेलं दिसून येत नाही. सदरील अर्ज हे परीक्षा अर्ज भरण्यापूर्वी भरल्यास विद्यार्थ्यांना कुठल्याही अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. याकरिता महाविद्यालयातर्फे पुनःश्च एकदा ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याकरिता स्पेशल ड्राईव्हचे आयोजन केले आहे.

**स्कॉलरशिप व फ्रीशिप स्पेशल ड्राईव्ह**
**वार व दिनांक: सोमवार, २४/०२/२०२५**
**वेळ: सकाळी १०.३० ते १२.३०**
**ठिकाण: दुसरा मजला, कॉम्प्युटर लॅब, एमएमसीसी बिल्डिंग**

जे विद्यार्थी अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील शिष्यवृत्तीस अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत अश्या विद्यार्थ्यांनी FRESH तसेच RENEWAL चे अर्ज **https://mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता खालील नमूद केलेले सर्व ओरिजनल कागपत्रे **२५६ kb च्या आत jpeg स्वरूपात पेनड्राईव्ह मध्ये अथवा स्वतःच्या ई-मेल आयडीवर** अपलोड करण्यासाठी तयार ठेवावेत, जेणेकरून अर्ज भरताना कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही.

चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी **Marathwada Mitra Mandal's College of Commerce (३४८९)** असे महाविद्यालयाचे नाव निवडावे व फी भरल्याबाबतच्या रकान्यात **०.०० (शून्य रुपये)** असे नमुद करावे व महाविद्यालयाने ऑनलाईन पारित केलेली फी ची पावती शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शिकत असलेल्या वर्गाकरिता अपलोड करावी. RENEWAL करीत असताना अर्ज मागील (2023-2024) वर्षी लागू केलेल्या शिष्यवृत्ती (Scholarship) अथवा फ्रीशिप (Freeship) नुसारच लागू करावा.

शिष्यवृत्ती (Scholarship) साठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/- पर्यंत आहे व व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीता रु. १,५०,०००/- पर्यंत आहे. तसेच अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती साठी फ्रीशिप (Freeship) साठी उत्पन्न मर्यादा नसून व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव फ्रीशिप (Freeship) साठी ची कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/- इतकी आहे. BBM-IB या अभ्यासक्रमाकरीता व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील विद्यार्थ्यांना कुठल्याही शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप चा लाभ घेता येणार नाही याची सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | १० वी, १२ वी/ ग्रॅज्युएशन उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (ओरिजनल) |
| २. | मागील शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (ओरिजनल) ऑनलाईन निकाल असल्यास महाविद्यालयाने साक्षांकित केलेली प्रत |
| ३. | १० वी /१२ वी /ग्रॅज्युएशन पदवी सोडल्याचा दाखला (ओरिजनल) |
| ४. | विद्यार्थ्यांच्या नावाचे डोमेसाइल सर्टिफिकेट (ओरिजनल) |
| ५. | विद्यार्थ्यांच्या नावाचा जातीचा दाखला (ओरिजनल) |
| ६. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२०२४चा तहसीलदार चा दाखला (उत्पन्न मर्यादा योजनेच्या नियमांनुसार) (Original) |
| ७. | आधारकार्ड (ओरिजनल) |
| ८. | राशनकार्ड (ओरिजनल) |
| ९. | विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकचे पहिले पान (ओरिजनल) |
| १०. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (ओरिजनल) |
| ११. | चालू वर्षा करीता पालकांचे अपत्यां बाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र |

MAHADBT पोर्टल वर ऑनलाईन अचूक अर्ज भरलेल्या अर्जाची प्रत व इतर वरील वरिल नमूद केल्या क्रमवारीनुसार कागदपत्रे महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात त्वरित जमा करावे. वेळेत न प्राप्त झालेल्या अर्जांवर महाविद्यालयाकडून कुठल्याही प्रकारची कार्यवाही होणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्व मागासवर्गीय पात्र विदयार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार लागू असल्याप्रमाणे स्कॉलरशिप अथवा फ्रीशिपचा अर्ज भरणे क्रमप्राप्त असून, तो न भरल्यास अथवा मंजूर न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील व महाविद्यालयाची शैक्षणिक फी व इतर उर्वरित फी भरणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील. व त्याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार स्वीकारली जाणार नाही.

Harshala

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

**श्रीमती. हर्षला वाडकर**
प्रशासन अधिकारी

**डॉ. गणेश पटारे**
प्रभारी प्राचार्य